# मैत्रेयी !

आज मी तुम्हाला जी कथा ऐकवणार आहे ती एका विदुषीची. माझ्या आयुष्यात डोकावलेल्या एका सुंदर नि बुद्धिमान स्त्रीची. सुंदर आणि बुद्धिवान तरुणी म्हणजे विधात्याच्या हातून घडलेला अपघातच, नाही का ?

हो... पण तसा घडलाय खरा. म्हणजे मी प्रत्यक्ष पाहिलाय ना तो. अनुभवलाय.

तेव्हा नमनालाच घडाभर तेल असं न करता सुरुवातच करतो ना कथेला –

तर तिचं नाव मैत्रेयी – मैत्रेयी शारंगपाणी. चटकन डोळ्यात भरावे, अथांग डोहात बघत आहोत असं वाटायला लावणारे तिचे टपोरे काळेभोर डोळे, सरळ चाफेकळी नासिका, फडक्यांच्या कादबंतरीतील नायिकेप्रमाणे धनुष्याकृती भुवया, भव्य भालप्रदेश, केतकी वर्ण. वर्णन अजून कुठपर्यंत करीत राहू ? अजिंठ्यातील अप्सरा नजरेसमोर आणा म्हणजे झालं किंवा तुमच्या कल्पनेतील एखादी स्वरूप सुंदर तरुणी.

आणि अशी ही मैत्रेयी वर्गात गणित, सांख्यिकी वगैरे विषय शिकवायला आली की नवथर कॉलेज स्टुडंटस्चं काय होत असेल ? कल्पना करा.

हो. सांगायचं विसरलो. ही मैत्रेयी आमच्याच कॉलेजमध्ये लेक्चरर होती. गणिताची आणि सांख्यिकीची. अन् मी तत्त्वज्ञानाचा लेक्चरर... म्हणजे आमचा तसा संबंध आला. आला म्हणजे काय ? मीच पुढाकार घेऊन तिच्याशी मैत्री केली. तिच्या रूपाचं आकर्षण ?

हो ! नाही कशाला म्हणू. ते तर वाटलंच. पण अजून एक कारण होतं. एक कुतूहल.

मैत्रेयी शारंगपाणी नावाची एवढी सुंदर, विद्वान तरुणी वयाची तिशी उलटली तरी अजून अविवाहित कशी ? तिच्या आयुष्यात कुणीच तरुण आला नाही ? तिला आवडणारा. ठीक आहे. प्रेमात वगैरे ती पडली नसेल कुणाच्या. अशा तरुणी म्हणजे कशा ? ते आता तुमच्या लक्षात आलं असेलच नाही असं काही करीत. पण तिच्या घरच्यांनी तरी काही खटपट करून तिचा विवाह का जुळवून देऊ नये ? ते तरी असे स्वस्थ कसे बसलेत ?.... नाही, म्हणजे तिला आई–वडील आहेत एवढी माहिती मी तोवर गोळा केली होती. मग ?

बरं, तिच्या सहकाऱ्यांशी ती इतकी सहज, मनमोकळी वागत असे की, ती मनात कुठं झुरत, कुढत असेल असंही दिसत नव्हतं. गणित-सांख्यिकीची प्राध्यापिका असूनसुद्धा ती तशी म्हणजे आपण उगीचच कल्पना करतो तशी, रूक्ष किंवा जड नव्हती. उलट खूप मनमोकळी, खट्याळ अन् विनोदी स्वभावाची होती. माझा एक प्राध्यापक मित्र तर तिला हसताना पाहून म्हणायचा – 'आपल्या कॉलेजमधील मधुबाला आहे यार ही – तशीच खट्याळ, मिलियन डॉलर स्माईल करणारी, वा: क्या बात है'

कुतूहल जास्तच गडद होत गेलं आणि वैतागून त्यातून सुटका करून घेण्याचा मी जो जो प्रयत्न करू लागलो तो तो एखाद्या लोचटाप्रमाणे ते मला अधिकच चिकटू लागलं. शेवटी ठरवलं. हीची साधी ओळख तर आहेच. आता पक्की मैत्रीच करायची. तिच्या विश्वासातील एक व्हायचं. अगदी प्रयत्नपूर्वक. आणि काही दिवसांनीच मी तिच्या विश्वासातील एक झालो. अगदी जीवाभावाचा मित्र.

कसा ?

ते जाऊ द्या. ती एक वेगळीच कथा होईल. त्याचं इथं प्रयोजन नाही. गणित आणि तत्त्वज्ञान हे विषय तसे जवळचेच. ते पुरेसं ठरलं. एवढंच सांगतो.

अन् माझ्या लक्षात आलं की मी एवढा तत्त्वज्ञानाचा व्यासंग केलेला पण तिच्या विचारांसमोर चकित व्हायची माझ्यावर पाळी आली. कशी ? तेच सांगतो –

प्रथम म्हणजे ती चक्क नास्तिक होती. विस्मय वाटला नं ? स्त्री आणि नास्तिक ? प्रश्न पडला ना ? मलाही पडला होता तसाच.

एक दिवस कोयनेच्या भयानक भूकंपाची बातमी कॉलेजमध्ये आली आणि सारेच हादरले. जसजशा अधिक वार्ता येऊ लागल्या तसतशी भूकंपाच्या भयानकतेची कल्पना येऊ लागली. प्रथम धक्क्यातून थोडे सावरल्यावर कॉलेजचा स्टाफ व विद्यार्थी यांनी सेवा-सुश्रूषा पथक उभारले व आम्ही सारे भूकंपग्रस्त भागात मदतीसाठी निघालो. मानवतेची मागणी म्हणून मैत्रेयीनंच पुढाकार घेतला होता.

प्रत्यक्ष भूकंपग्रस्त प्रदेशात गेल्यावर त्याच्या भयानकतेचा प्रत्यय खऱ्या अर्थानं आला. जागोजाग विखुरलेली प्रेतं. दुर्गंधी पसरलेली – असह्य ! घराचे ढिगारे आणि वाचलेल्यांचा आपल्या आप्तस्वकियांच्या निधनाबद्दलचा शोक.

काहींचे अश्रू आटलेले. अन्नपाण्याअभावी होत असलेले हाल. तशाही अवस्थेत त्यासाठी चालणारी धडपड. एक नवीन दर्शन, अनुभव अंतःकरण पिळवटून टाकणारा,-आम्ही सारे कामाला लागलो.

जवळच एक ढिगारा उपसल्या जात होता. एक तुटलेली तुळई उचलून बाहेर काढल्याबरोबर एकदम ओरडा झाला. आश्चर्योद्गार उमटले. आम्ही उत्सुकतेनं जाऊन पाहिले. तुळईखाली एक वर्षाचं बाळ जिवंत सापडले. त्या लहानग्या जीवाला कसलीच जाणीव नव्हती. फक्त भुकेनं ते व्याकुळ झालं होतं. रडत होतं. आमच्या पथकातील एक प्राध्यापक एकदम उद्गारले -

"वा ! देवाची लीला अगाध आहे. मानावं लागतं. या निष्पाप बालकाला कसं वाचवलं पाहा." त्यांनी आकाशाकडे पाहात हात जोडले.
मी मैत्रेयीकडे साभिप्राय पाहिलं आणि मला का कुणास ठाऊक पण असं वाटलं की तिच्या चेहऱ्यावर अस्पष्ट स्मित उमटलं. मला ती गोष्ट जरा लागलीच. रात्री दमूनभागून आपल्या तात्पुरत्या निवाऱ्याकडे परतल्यावर पोटात चार घास ढकलून मी राहुटीसमोर एक खुर्ची घेऊन बसलो होतो. मैत्रेयी पण काही वेळानं समोर येऊन बसली. पौर्णिमा असावी. चंद्रसुद्धा विवर्ण चेहऱ्यानं खालचे उद्ध्वस्त जग पाहात होता. वातावरणात उदास शांती. लांबून कुठूनतरी कुणाचे क्षीण आक्रंदन ऐकू येत होते - भेसूरता अधिक गडद करणारे.

माझ्या पोटात मघापासून ढवळत असलेला प्रश्न मैत्रेयीला पाहून अखेर ओठांवर आलाच.

"मैत्रेयी, खरंच म्हणतात ना, देव तारी त्याला कोण मारी. तसाच प्रत्यय आला मघाशी. नाही का ?"

मैत्रेयी अस्पष्ट हसली. यावर मला जरा रागच आला. रागानंच म्हणालो, "तुला हसू येतं ? मी पाहिलंय मघाशी तुला हसू दाबताना. त्या प्राध्यापकाच्या उत्स्फूर्त उद्गारावर आलेलं."

"पण दाबलं नं मी ते. काळवेळ मलाही समजते म्हटलं." मैत्रेयीचा मिष्किल स्वर. मी चिडलो.

'हो. पण ही काय हसण्यावारी नेण्याची गोष्ट आहे ? खरं म्हणजे हा चमत्कार बघून कुठंतरी एखादी अदृश्य शक्ती अस्तित्त्वात आहे असं जाणवतं. पटतं.'

'हो का ! मग त्या शक्तीनं त्या बाळालाच का वाचवावं ? अन् इतर

इतके जीव गेले त्याचं काय ? की तीही तिचीच इच्छा ?' मैत्रेयीनं युक्तिवाद सुरू केला.

"अगं, पण तो निष्पाप कोवळा जीव."

मध्येच मला तोडत ती म्हणाली –

"म्हणजे जे गेले ते सारे पापी ? मृतात अनेक कोवळी मुलंही होती म्हटलं."

"म्हणजे तुला म्हणायचं तरी काय ?" माझी पृच्छा.

"केवळ अपघातानं, योगायोगानं वाचलं ते मूल. देव असेल तर वाचवेल ना तो."

"म्हणजे तू देव मानत नाही ?" मी चक्क आश्चर्याने ओरडलोच. ती शांत पण दृढपणे उत्तरली 'नाही !'

"नाही ? या अफाट विश्वाचं नियंत्रण करणारी एखादी शक्ती."

"निसर्गशक्ती – निसर्गशक्ती मानते मी" मला तोडत मैत्रेयी उत्तरली.

'म्हणजे तेच. शब्द वेगळे. आशय तोच. फरक काय आहे त्यात ?' मी 'जितं मया'च्या सूरात म्हणालो.

"फरक आहे. देव मानला की त्याची भक्ती आली. चमत्कार आले. पुण्यवानाला तो तारणार. पाप्याला शिक्षा करणार. चोचले पुरवणार. चमत्कार करून. निसर्गशक्तीला मानलं तर हे सारं गळून पडतं. ती शक्ती आपल्या नियमांप्रमाणे वागणार. एवढंच राहतं." मैत्रेयी पटवून देऊ लागली की तिच्या भव्य कपाळावरची एक शीर उठून दिसू लागायची.

'तूच सांग. देवानं हा भूकंप घडवून आणला असं समजायचं का ? या भागातील बहुसंख्य लोक पापी होते का ? वाचले ते सारे पुण्यवान ?'

'तुझं काय मत ?' मी मूढ.

"निसर्गाच्या घडामोडींपैकी एक घडामोड. बस्स. परिणामाची त्याला कसली काळजी ? ती आता आपण करायची. यातून मार्ग काढायचा. त्या शक्तीचे नियम शोधायचे. त्यांचा आपल्या, मानवाच्या सुखाकरितां वापर करायचा. बुद्धी वापरायची. संपलं."

ती संपलं म्हणाली. पण संपलं काहीच नाही. माझे प्रश्न संपले नाही. तिच्याबद्दलचं आश्चर्य संपलं नाही. कोडं उलगडलं नाही. मदतकार्यात अहमहमिकेने श्रम करणारी मैत्रेयी म्हणजे एक कूट प्रश्नच होता. दुसऱ्याच दिवशी एक ढिगारा

उपसणाऱ्या एका भुरट्या चोराला ढिगाऱ्याखाली सापडलेल्या चांदी-सोन्याच्या देवांना चूपचाप आपल्या बंडीच्या खिशात लपवताना पाहून मला साभिप्राय कोपरानं ढोसणारी मैत्रेयी, ही अशी ! केवळ निसर्गाला मानणारी.

असं जर आहे तर मग तिला तिच्या शरीराच्या नैसर्गिक हाकेला कधी ओ द्यावीशी वाटली नसेल ? त्यासाठी समाजसंमत विवाह करण्याची गरज भासत नसेल ? की तिला आकर्षण वाटावं असा पुरुषोत्तम तिच्या आयुष्यात आलाच नाही अजून ? की अजून काही ? प्रश्नांचं वादळ त्या क्षणीच मनात घोंगावू लागलं. पण मी स्वत:ला आवरलं. ती वेळ तशी नव्हती. मला कळत होतं.

पण दडपलेले प्रश्न असा पिच्छा सोडतात काय ? पण मैत्रेयीच्या सहवासात, चर्चा करताना ते काही ओठावर येत नव्हते. भिडस्तपणापेक्षा तिनं रागावून आपली मैत्रीच तोडली तर ? ही भीती. शेवटी एक दिवस न राहवून मी आमच्या सौभाग्यवती जवळच मन मोकळं केलं. म्हटलं एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीचं मन जाणू शकेल. पण--

प्रथम आमच्या सौ.नं भेदक नजर रोखीत विचारलं, 'का हो ? तुम्हाला का तिचा एवढा कळवळा, अं ?'

तुमचा काय अनुभव आहे मला माहीत नाही, पण सौ. नं. अशी नजर रोखली की आपल्याला बुवा अगदी नागवं झाल्यासारखं वाटतं. ती शोधक नजर अगदी आपल्या मनाच्या तळापर्यंत पोहोचली आहे असं वाटून गडबडून मी म्हणालो.

''तसं काही नाही गं. पण वाटतं एवढी सुंदर, शिक्षित तरुणी ! वाया चाललंय तिचं आयुष्य. तिला शोभेल असा जोडीदार मिळाला तर किती छान होईल ? म्हणून केवळ सहानुभूतीमुळे...''

मला तोडत ठसक्यात सौ. म्हणाली, 'कशाला हवी सहानुभूती ?' तिला लाख वाटत असेल. पण अशा बेधडक बाईशी कोण लग्न करणार ? संसार म्हणजे उठसूठ वाद चर्चा करणं नव्हे.'

'अगं पण तिच्या सौंदर्याचं आकर्षण कुणालाच वाटू नये ?' मी आश्चर्य व्यक्त केलं

'वाटतं ना. पण तेवढ्यानं भागतं का ? तुम्हाला सांगते. पुरुष कितीही झटकन मोहात पडणारा असला तरी कायमची जोडीदार निवडताना फार चिकित्सक

बनतो. आपल्याला डोईजड होणारी बायको कोण करणार ?'' सौ. उवाच.

'नाही ! म्हणजे वाटतं तुला तितकी काही ती...' मी माझं अवसान गोळा करतो. पण मला ताडकन तोडत सौ. निर्वाणीच्या सूरात म्हणाली.

'तुम्ही काही तिचं वकीलपत्र घेऊ नका. मला माहीत आहे. ती कशी आहे ती. काही स्त्रीत्व आहे का तिच्यात ? नुसत्या रूपाला काय चाटायचं आहे ? ती अशीच राहणार' आणि सौ. न हाताला असा काही फलकारा दिला की मी समजलो. तिच्या दृष्टीने हा विषय संपला होता.

मी एक पाहून ठेवलं आहे. बहुतेक बायकांचं काम अगदी सोपं असतं. त्या आपली मतं ठाम बनवून टाकतात, अन् मोकळ्या होतात. एकदा एखाद्या व्यक्तीचा ब्रँड ठरवला की मग काथ्याकूट नाही.

पण आम्ही तत्त्वज्ञानाचे प्रोफेसर ! आमचे तर्कवितर्क करणं चालूच राहिलं – अर्थात मनातल्या मनात !

अन् अशातच एक दिवस मैत्रेयी एखाद्या झंझावातासारखी आली आणि मला म्हणाली, 'चल उठ ! मला अनाथाश्रमात जायचंय. मला तुझी मदत हवीय.'

तिचं असं येणं माझ्या परिचयाचं होतं. ती काहीतरी ठरवून आली असणार. मी विचारलं, 'कशाची मदत ?'

''मला एक मुलगी दत्तक घ्यायची आहे. दत्तक'' डोळे मिचकावीत पुढे ती म्हणाली. 'निसर्गाच्या हाकेला ओ द्यायची आहे मला. एखाद्या पोरक्या मुलीला पाळावं, पोसावं, मोठं करावं असं अलीकडेच फार वाटू लागलंय. उठ!' माझा दंड पकडून मला उठवत ती म्हणाली.

मी मुकाट चालू लागलो. नाहीतरी तिच्यासमोर माझं काही चालणार नव्हतंच. चालता चालता ती एवढंच म्हणाली – 'लक्षात घे. मीसुद्धा एक स्त्रीच आहे.'

आम्ही अनाथाश्रमात गेलो आणि मैत्रेयीसाठी एक चार–पाच वर्षांची गोड चेहऱ्याची मुलगी पसंत केली. तिनं तिला दत्तक घेतली. विधीवत तिचं नाव तिनं शकुंतला ठेवलं. मैत्रेयीच्या घरी मी जेव्हा जेव्हा जात असे तेव्हा तेव्हा मैत्रेयी त्या दत्तक मुलीचं संगोपन अतिशय वात्सल्यानं करीत असताना मला दिसत असे. मी थक्क होत असे. कुठं तिचा तो बुद्धिमत्तेनं चमकणारा तेजस्वी चेहरा अन् कुठे हा ! वात्सल्य मूर्तीमंत ओसंडून वाहणारा मायाळू चेहरा.

कोणती मैत्रेयी खरी ? की दोघीही खऱ्या ? डबल रोल ? तिच्या या नवीन रूपानं माझ्या मनात अजून एका प्रश्नानं जन्म घेतला.

"दत्तकच घ्यायचं तर मुलगा का नाही ? मुलगीच का ? आणि तीही चांगली समज आलेली. ही आपली खरी आई नाही हे शकुंतलेला चांगलं कळत होतं."

अचानक एक दिवस हे कोडं उलगडलं. तिच्या आईवडिलांकडून.

एकदा मैत्रेयी घरी नसताना मी तिच्या आई-वडिलांना विश्वासात घेऊन विचारलं की तुम्हाला तरी कसं पसंत पडतं तिचं असं वागणं. तेव्हा ते म्हणाले – 'आमचंच चुकलं. एकुलती एक मुलगी. कुशाग्र बुद्धीची. मुलासारखी वाढवली. तिचाच आम्हाला आधार. तरीपण आम्ही तिचं मन वळवण्याचा खूप प्रयत्न करून पाहिला. तिनं लग्न करावं म्हणून. वय उलटून चाललं होतं तिचं." वडील उसासून थोडे थांबले. मग पुढे म्हणाले.

"ती काय म्हणाली माहीत आहे ? म्हणाली, मी मुलगा असते अन् लग्नाशिवाय राहिले असते तर काय केलं असतं तुम्ही ? आपल्या समाजात पुरुषानं अविवाहित राहणं चालतं. चालतंच नाही नुसतं. त्याच्याभोवती वलय उत्पन्न होतं. आदराचं. तेजाचं. वैराग्याचं. मग स्त्रीलाच का हिणवलं जात ? फरक काय आहे दोघात ?" वडील बोलायचे थांबले तशी तिची आई हताशपणे म्हणाली –

'मला समजावून घेणारा जोडीदार मला मिळेल अशी खात्री नाही आणि मला कुणाच्या ताब्यात राहणं, माझ्या तत्त्वांना मुरड घालणं जमणार नाही. तेव्हा नकोच ती रिस्क – असं म्हणते ती."

वडील परत बोलायला लागले. "आम्ही दोघांनी तिला खूप समजावलं. आश्वासन दिलं की तुला समजावून घेणारा, सुशिक्षित, स्त्री-पुरुष समानता मानणारा जोडीदार निवडून, शोधून देण्याची जबाबदारी आमची. मग तर झालं ? तर तिनं काय उत्तर द्यावं माहीत आहे ?"

'काय ?' मी नकळत.

म्हणाली, "पुरुष कितीही प्रगतीशील, समानता मानणारा असला तरी निसर्गत:च थोड्या प्रमाणात का होईना पण वर्चस्ववादी असतोच. मे बी इन् लो पर्सेंटेज. पण असतोच. अन् असायलाच हवा. हा निसर्गच आहे. पण तेवढाही इगो मला सहन झाला नाही तर ? म्हणून म्हणते बाबा – आई, माझ्यापुरता हा

प्रश्न निकालात निघाला आहे. तुम्ही राहा ना माझ्याबरोबर सुखात. मला आपला मुलगाच समजून.'' ते बोलायचे थांबले तरी तिची आई आवेगानं बोलायला लागली.

'शेवटी मी तिच्यातल्या वात्सल्याला आवाहन केलं अन् तिनं काय केलं तुम्हाला माहीतच आहे.'

'हो! मी म्हणालो. पण मला प्रश्न पडलाय की, दत्तकच घ्यायचं होतं तर मुलगा का नको ? मुलगीच का ? अन् तीही चांगली समज आलेली ? माझ्या पोटातील प्रश्न वर आलेच. 'ताबेदारी' तिचे वडील एका शब्दात उत्तरले. त्यांनी आपल्या डोक्यावरून हात फिरवीत माझ्याकडे पाहिलं. माझ्या चेहऱ्यावरचा गोंधळ त्यांना स्पष्ट दिसला असावा. ते समजावू लागले.

'मुलांची जबाबदारी शेवटपर्यंत संपतच नाही. काही ना काही चालूच असतं त्यांचं. उलट मुलगी मोठी होऊन सासरी गेली की आपण मोकळे. काही दिवस माहेरपणाला येईल, थोडीबहुत मदत करावी लागेल, थोडा लळा लावेल. बस्स. तिचेच शब्द हे.'

''अहो आम्ही तिला इतकं विनवलं की कमीतकमी समज न आलेली मुलगी तरी सांभाळ तर म्हणाली, ''कशाला ? मला तिनं आई म्हणायला नको. माईसुद्धा नाही.'' ताई म्हणायला शिकवलं तिनं शकुंतलेला. कशाकशात म्हणून अडकायला तयार नाही ती. असं आहे. थांबा चहा आणते.'' तिची आई आत जात म्हणाली.

चहा घेताना माझ्या मनात विचार आला. असामान्य अपत्य असणाऱ्या मात्या-पित्यांचं दुःखही असामान्यच असतं म्हणायचं.

तर अशा ह्या माझ्या असामान्य, विलक्षण मैत्रिणीची नि माझी लवकरच ताटातूट झाली. तिला स्टेटस्मध्ये कोणत्याशा विद्यापीठात फेलोशिप मिळाली आणि हे सगळं कुटुंबच शकुंतलेसमवेत तिकडे गेले. काही दिवस तिचा माझा पत्रव्यवहार चालू होता. नंतर तोही थंडावला. काही वर्षांनी तिचं एक पत्र अनपेक्षित आलं. आई-वडिल अचानक एका अपघातात गेले. कळवणारं. तसंच शकुंतलेनं तिथल्याच एका अमेरिकन मित्राशी प्रेमविवाह केला हेही कळवणारं. त्या पत्राचा शेवट मला अजूनही आठवतो. तिनं लिहिलं होतं.

'मी आता पुरती मोकळी झालीय. आपल्यातच रमायला. संशोधन चालू होतंच. ते आता जोरात करणार. अगदी बुडून जाणाराय त्यात.''

याचा अर्थ तिथल्या मुक्त समाजातही मैत्रेयीला हवा तसा जोडीदार मिळाला नव्हता म्हणायचा. मी तिला एक औपचारिक सांत्वनाचं पत्र पाठवलं. आमचे संबंधसुद्धा आता औपचारिकच झाले होते इतक्या वर्षांनी.

असं होतं. अंतर वाढलं. दृष्टीआड सृष्टी झाली की एकमेकांविषयीचं प्रेम, जवळीक, औत्सुक्य वगैरे भावना अशा वठत असाव्यात. भूतकाळात जमा होत असाव्यात. आपणही आपल्या व्यापात गुंतून गेलो असतो. रिकाम्या वेळी मुद्दाम आठवणींची टेप लावली तर आठवणाऱ्या पण कोरडेपणानं ! मैत्रेयीच्या आठवणीबद्दल असंच झालं होतं. पण अचानक हा भूतकाळ परत जिवंत होऊन माझ्यासमोर उभा राहिला.

काय झालं. एका मोठ्या शहरात मी असाच कथाकथनाला गेलो होतो. तिथं मला गप्पांच्या ओघात कळलं की मैत्रेयी भारतात परतली असून तिथल्याच एका रिसर्च सेंटरमध्ये मोठ्या पदावर आहे. माझ्या जुन्या सगळ्या आठवणी जागृत झाल्या. अन् अनिवार ओढीनं मी तिला भेटायला त्या सेंटरमध्ये गेलो.

तिच्या ऑफिसचं दार ढकलून मी आत गेलो. समोरच्या विस्तीर्ण टेबलामागे मैत्रेयी गोल फिरणाऱ्या खुर्चीवर ! डोळ्यांवर विश्वासच बसेना. फार बदल झालेला होता म्हणून ? छे. छे. उलट वाढत्या वयाच्या खुणा फारशा दिसल्या नाहीत म्हणून. थोडक्यात सांगायचं तर इतकंच सांगतो की जर मधली सारी वर्षं एकदम गुप्त झाली असती आणि मी नेहमीसारखा तिला भेटलो असतो तर एवढंच विचारलं असतं, "मैत्रेयी ! अग केसांची अशी बॉयकट का करून घेतलीयस ? किती सुंदर शेपटा होता तुझा !"

म्हणजे जरा जास्तच निरखून पाहिल्यावर दिसल्या म्हणा वाढत्या वयाच्या खुणा चेहऱ्यावर. डोळ्याखालच्या सुरकुत्या. पण फार अस्पष्ट.

ती म्हणाली. 'ये बस. किती वर्षांनी भेटतो आहोत आपण नाही ?'

'हो नं.' मी तिच्यासमोर बसत म्हणालो. 'इथं आहेस असं कळलं अन् लगेच भेटायला आलो. एक ॲप्रिशिएट करायला हवं हं, तू फिगर छान मेंटेन केलीयस. फक्त डोळ्यांना जाड चष्मा लागलाय.'

पूर्वीसारखीच खळखळून हसत मैत्रेयी म्हणाली, 'तुझा अगदी अपेक्षाभंग झाला असेल ना ? तू कल्पना केली असणार एखादी पन्नाशीची, केस पिकलेली, चेहऱ्यावर रेषा उमटू लागलेली स्थूलशी बाई समोर दिसेल म्हणून."

''या बाबतीत तरी तू निसर्गावर मात केलीयस खरी.'' मी कौतुकानं म्हणालो. नकळत समोरच्या आरशात आपला टक्कल पडलेला चेहरा न्याहाळत संकोचलो.

'पुन्हा चूक. मात करून नाही.'

''निसर्ग नियमांचा उपयोग आपल्या फायद्याकरिता करून'' मी तिला तोडत म्हणालो. आणि दोघंही मनसोक्त हसलो. नंतर बराच वेळ आम्ही जुन्या आठवणी काढत बोलत बसलो होतो. माझा हालहवाल, तिचं स्टेटस्‌मधलं जीवन, तिचा रिसर्च, प्रगती वगैरे विषयही ओघात आले. ''मोठा कथालेखक झालाय म्हणे तू'' मैत्रेयी कौतुकाने म्हणाली. अन् माझ्या मनात आजवर दबलेला दडपेला तो प्रश्न ओठावर आलाच. सावधगिरी घेऊन मी विचारलं.

''मैत्रेयी, आता तू आणि मी वयाच्या अशा वळणावर उभे आहोत की मी आता तुला जो प्रश्न विचारणार आहे. त्यामुळे आपल्या दोघांत कोणताही गैरसमज होण्याची शक्यता नाही. तसंच तुझं उत्तर माझ्याजवळ अगदी गुप्त राहील याची तुलाही खात्री राहील.''

''याही वयात तुझी प्रश्न विचारण्याची जुनी खोड गेली नाही एकूण'' मैत्रेयीचे डोळे मिष्किल झाले. क्षणभर नंतर गंभीर होत ती म्हणाली,

'विचार'

'मैत्रेयी खरं सांग. तुला शरीरसुखाची कधीच इच्छा झाली नाही ?'

'झाली.' मैत्रेयी किंचित मान डोलवीत म्हणाली. 'आणि ती तू दडपून टाकलीस आजवर, असंच ना ?' मी जवळजवळ खात्रीनंच विचारलं.

'दडपली हे खरं. पण ती इथं असताना.'

'म्हणजे परदेशात तू ?' मी तिला मध्येच तोडून विचारलं.

माझ्या विचारण्यात कोणती भावना होती माझं मलाच कळलं नाही.

मैत्रेयी संथ. संयमी सूरात बोलू लागली. 'हो. मी स्टेटस्‌ला गेली नसती तर कदाचित मला ती आयुष्यभर दडपूनच ठेवावी लागली असती. आपल्या समाजाला मुक्त आचारविचार, विशेषतः या विषयातला शिष्ट संमत नाही म्हणून. पण स्टेटस्‌मधला समाज आपल्यापेक्षा बराच/फारच मुक्त आहे. शारीरिक संबंधाबरोबर अपरिहार्यपणे येणारी व्यक्तिगत बांधिलकी तिकडे नाही. खऱ्या अर्थानं मन जुळल्याशिवाय केवळ एखादेवेळी शरीरसंबंध झाला म्हणून विवाह बंधनात अडकण्याची अपरिहार्यता तिथे नाही. समाजात अशा व्यक्तीची

प्रतिष्ठा केवळ याचमुळे धोक्यात येण्याची शक्यता नसते. थांब ! ते बरोबर की चूक ह्या वादात मला शिरायचे नाही. एवढंच सांगायचं की अशा समाजात मला आवडणारा एक तरुण मला भेटला. तरुण म्हणायचं पण मध्यमवयीन पुरुष म्हणणं जास्त सयुक्तिक होईल. बरोबरीने वागणारा, वर्चस्व गाजवण्याचा विचारसुद्धा मनात न आणणारा, माझ्या संशोधनावर भाळलेला, माझ्या व्यक्तित्वानं मोहून गेलेला तो तरूण ! मी त्याच्याकडे आकर्षित झाले नसते तरच नवल झालं असतं. तोही आपल्या क्षेत्रात मोठी कामगिरी करीत होताच. एकमेकांच्या क्षेत्रात ढवळाढवळ न करण्याचं उलट जमेल ती मदतच करण्याचं आमचं आपोआपच ठरलं हातं. दोघांचेही जीवनप्रवाह असे समांतर चालले होते. मला हवे तसे, पण ती किंचित थांबली. आपल्याच मनाचा तळ शोधत असल्यासारखी, माझ्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह उमटलं असावं. पण मी काहीच विचारलं नाही. वाट पाहात बसलो. कानांचे द्रोण करून.

मैत्रेयी भानावर आली. माझ्या चेहऱ्यावरचं प्रश्नचिन्ह तिनं वाचलं असावं. ती परत बोलायला लागली.

"एकदा अशाच एका डेटिंगमध्ये त्याचा नि माझा शरीरसंबंध आला. अगदी नकळत. काहीही न ठरवता. नंतरही काही वेळा आम्ही एकमेकांत गुंतलो. कुठलीही अनैतिकतेची भावना आमच्या मनात आली नव्हती. पण एक गोष्ट मलाच जाणवू लागली. तू हसशील. तुला पटणार नाही. त्यालाही पटलं नव्हतंच. पण ते सुख मिळवताना मला थोडं पॅसिव्ह व्हावं लागायचं. नैसर्गिकच आहे ते. निसर्गतःच पुरुष पझेसिव्ह असतो. त्यानंच त्याला वर्चस्व दिलंय त्या क्रीडेत. म्हणूनच त्यानं जेव्हा विवाहाचा प्रस्ताव मांडला तेव्हा माझ्या मनानं नकळत एक गणित केलं. या एवढाशा सुखाच्या मोबदल्यात मी माझी आजवरची जीवनपद्धती शतांशानं का होईना पण बदलावी का ? इतर सर्व सुखांवर/आकांक्षांवर तिलांजली देण्याइतकं ते मोठं आहे का ? मोठ्या शाश्वत सुखाची अपेक्षा करणाऱ्याला, क्षणिक सुखाचा त्याग करावा लागतोच ना ? हे असं गणित आहे. म्हणून आम्ही केवळ मित्रच राहायचं ठरवलं. तिथे असेपर्यंत. अजूनही आहोत. आता बोल." मैत्रेयी माझ्याकडे डोळे रोखून पाहू लागली. तिची ती कपाळावरची शीर उठून उभी राहिली होती.

मी काय बोलणार? मी नेहमीप्रमाणे निरुत्तर झालो होतो. खरं सांगतो, हा प्रश्न विचारताना माझ्या मनात कुठंतरी अंधुकशी आशा होती की यावेळी तरी

मैत्रेयीचे गणित चुकणार. पण नाही. हे रसायन काही वेगळंच होतं.

ज्या शरीरसुखाची प्राप्ती व्हावी म्हणून इतिहासात मोठमोठी युद्धे झालीत, वर्तमानात गुन्हे घडलेत, महान व्यक्तींचे स्खलन झालेत. अकिर्ती झाली ती गोष्ट क्षुद्र मानून, आपल्या साधनेतून लीलया दूर करणारी ही मैत्रेयी मला आधुनिक तपस्वीनीच वाटली.

---